


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८४ वा ❑ शनिवार दि.१० जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवणे हा एक गंभीर गुन्हा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शासनाच्या अनेक विभागात खोटे दिव्याग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.. जाली सर्टिफिकेट मिळवून कित्येक उमेदवारांनी दिव्यांग असणाऱ्या उमेदवारांचे अधिकार हिरावून घेतले आहे.महाराष्ट्रात शासन स्तरावरून याची पडताळणी होत आहे.राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी बोगस दिव्यांगांविरोधात कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. बोगस कागदपत्रांच्या आधारे वैश्विक दिव्यांग ओळखपत्र मिळवून त्याआधारे सरकारी फायदे घेणाऱ्या दिव्यांगांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे मुंढेंनी स्पष्ट केले आहे.

दिव्यांग व्यक्तींना वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (यूडीआयडी) दिले जाते. त्याआधारे शासकीय, निमशासकीय नोकरीतील आरक्षण, विविध शासकीय योजना, आर्थिक सवलती आणि इतर लाभ दिले जातात. मात्र, काही ठिकाणी बनावट किंवा चुकीच्या तपासणी अहवालांच्या आधारे यूडीआयडी कार्ड मिळविण्याचे प्रकार समोर आले आहेत. यामुळे खऱ्या दिव्यांग व्यक्तींवर अन्याय होत आहे.ही बाब निदर्शनास आल्यानंतर यूडीआयडी कार्ड जारी करण्यापूर्वी संबंधित वैद्यकीय तपासणी अहवालांची पडताळणी संबंधित संस्थेमार्फत करणे आवश्यक असल्याचे आदेश तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. चुकीचे किंवा बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र घेणे अथवा देणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकरणांमध्ये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार संबंधित व्यक्तींवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत..

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, बनावट प्रमाणपत्रावर मिळालेली नोकरी किंवा प्रवेश अवैध ठरतो.खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवणे हा एक गंभीर गुन्हा असून, यामध्ये फसवणूक होते. असे केल्यास नोकरी गमवावी लागते, पदवी रद्द होऊ शकते, कायदेशीर कारवाई (शिक्षा) होऊ शकते आणि बडतर्फीही होऊ शकते, जसे की बनावट जन्माच्या प्रमाणपत्रावर नोकरी मिळवणारे बडतर्फ झाले. क्रीडा किंवा इतर बोगस प्रमाणपत्रांचा वापर करून नोकरी मिळवणाऱ्यांविरुद्ध सरकार मोहीम राबवत आहे, ज्यात दोषी आढळल्यास कठोर कारवाई होते.

बोगस प्रमाणपत्रांवर नोकरी करणारे सरकारी कर्मचारी बडतर्फ होऊ शकतात, जसे की अमरावतीमध्ये घडले. पदोन्नती किंवा बदलीमध्ये सूट मिळवण्यासाठी खोटे प्रमाणपत्र वापरल्यास ते रद्द होऊ शकते.

भंडारा जिल्ह्यात खोटं दिव्यांग प्रमाणपत्राचं प्रकरण समोर आलंय. खोटं प्रमाणपत्राद्वारे काहींनी सरकारी नोकरी मिळवली तर काहींनी नोकरीत पदोन्नती, बदलीत सूट मिळावी म्हणून खोटं दिव्यांग प्रमाणपत्र सादर केल्याचा धक्कादायक प्रकार जिल्ह्यात समोर आलाय. भंडारा जिल्ह्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा घोटाळा समोर आलाय. खोटी दिव्यांग प्रमाणपत्रं सादर करून अनेकांनी नोकरी मिळवली. काहींनी पदोन्नती मिळवली तर काहींनी नोकरीच्या बदलीतून सूट मिळवली. हे सुरू असताना जे खरोखर दिव्यांग आहेत त्यांच्यावर मात्र अन्याय झाला. अशा तक्रारी येताच अधिका–यांची झोप उडाली.

खोट्या प्रमाणपत्रावर नोकरी मिळवणे हे कायद्याने गुन्हा आहे आणि यामुळे भविष्यात गंभीर कायदेशीर आणि व्यावसायिक परिणाम होऊ शकतात.

विकलांग कोट्यातून नोकरी मिळवण्यासाठी ४० टक्के विकलांगत्वाची अट आहे. अशा लोकांनी प्रमाणपत्र काढल्यानंतर त्यांना यूडीआयडी क्रमांक मिळतो तो संपूर्ण देशात लागू होतो. पण असे प्रमाणपत्र एकही टक्का विकलांग नसणाऱ्या लोकांनी मिळवून सरकारी नोकऱ्या लाटल्याचे दिव्यांग कल्याण विभागाच्या चौकशीत पुढे आलं आहे.

चौकशीतून हेही समोर आलं, यामध्ये दृष्टी, कर्णबधिर, मानसिकदृष्ट्या विकलांग आणि एकाधिक विकलांग अशा ४ प्रवर्गातील जास्त बनावट प्रमाणपत्रं आहेत. म्हणजे जे विकलांगत्व सिद्ध करण्यासाठी वैद्यकीय चाचणीची गरज असते, अशा प्रकारातील जास्त बनावट सर्टिफिकेट आहेत.राज्याच्या विधान सभेत देखील हा मुद्दा गाजला.

आपापल्या विभागातील विकलांग व्यक्तींचे यूडीआयडी प्रमाणपत्र तपासण्याचे आदेश दिव्यांग कल्याण विभागाने दिले आहेत. त्यानुसार जानेवारीपर्यंत चौकशी पूर्ण होऊन कारवाई पूर्ण होईल अशीही माहिती दिव्यंग विभागाचे मंत्री श्री सावे यांनी दिली.

बोगस विकलांग प्रमाणपत्राची व्याप्ती मोठी आहे. विकलांग प्रमाणपत्र काढायला जिल्हा रुग्णालयात गेले की, एक दिवसात प्रमाणपत्र काढून मिळतं. त्यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याला कोणीही आव्हान देऊ शकत नाही.

अहमदनगर जिल्ह्यात ऑनलाईन पोर्टलवरून विकलांग नसलेल्या लोकांनीही प्रमाणपत्र काढले आहेत. गुन्हा देखील दाखल झाला आहे. राज्यातल्या प्रत्येक विकलांग प्रमाणपत्राची चौकशी होणे गरजेचे आहे. पण चौकशी करताना ज्यांनी प्रमाणपत्र दिले त्यांच्याकडून न होता विशेष समिती नेमून चौकशी व्हायला पाहिजे.

# वैजापूर येथे नवोदित लेखक कार्यशाळा उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**वैजापूर –** शब्दांच्या पाठीमागील विचार समजून घेण्याची, लेखनाला केवळ अभिव्यक्तीपुरते मर्यादित न ठेवता वैचारिक जबाबदारीची जोड देण्याची आणि नवोदित लेखकांच्या लेखनप्रवासाला योग्य दिशा देण्याची भूमिका बजावणारी एकदिवसीय नवोदित लेखक कार्यशाळा विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर येथे उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विनायकराव पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे होते. उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. कैलास अंभुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील मराठी भाषा संकुलाचे कवी प्रा. डॉ. पी. विठ्ठल यांनी केलेल्या बीजभाषणातून नवोदित लेखकांना लेखनातील वैचारिक आत्मभान आणि सर्जनशीलतेची दिशा मिळाली.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात ''मी आणि माझी कविता'' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात कवी धनंजय गव्हाळे, कवी निलेश चव्हाण, कवी धम्मपाल जाधव, कवी अविनाश भारती, कवयित्री गुंजन पाटील , कावेरी खरात, समृद्धी महापुरे, राधिका तुपे यांनी आपल्या लेखनानुभवांचे मनोगत व्यक्त करत कवितांचे सादरीकरण केले. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिरुद्ध मोरे (सिल्लोड) होते. कवितेतील आत्मशोध, सामाजिक भान आणि समकालीन जाणिवा यांवर सखोल चर्चा करत वक्त्यांनी रसिकांना अंतर्मुख केले. दुपारी आयोजित कवीसंमेलन हे कार्यशाळेचे विशेष आकर्षण ठरले. निमंत्रित व नवोदित कवींनी सादर केलेल्या कवितांनी सभागृहात शब्दांची ऊर्जामय अनुभूती निर्माण केली. नव्या आशयाचे, अनुभवप्रधान व संवेदनशील लेखन श्रोत्यांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. कार्यशाळेचा समारोप प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाने झाला. यावेळी मान्यवरांनी नवोदित लेखकांनी सातत्याने वाचन, चिंतन आणि प्रामाणिक लेखनसाधना करावी, असा मौलिक सल्ला दिला. या कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. ललित अधाने यांनी केले. आयोजनासाठी डॉ. जयप्रकाश चोरघडे, डॉ. राजेश कोळेकर, प्रा. संतोष तुपे, प्रा. संभाजी जाधव, प्रा. बाबासाहेब निमसे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य उल्हास ठोंबरे, उपप्राचार्य डॉ. संदीप परदेशी, डॉ. डी. के. ढमाले, कवी दत्तात्रय ठुबे, कवी अहमद पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नवोदित लेखकांमध्ये लेखनाविषयी आत्मविश्वास, वैचारिक स्पष्टता आणि साहित्यिक जाणीव निर्माण करण्यात ही कार्यशाळा मोलाची ठरल्याची भावना सहभागी व आयोजकांनी व्यक्त केली.

# तैवान प्रश्नावर ध्रुवीकरण अटळ

**ज्योतिर्मय साहित्य**



जगाचे राजकारण झपाट्याने बदलत आहे, मध्यपूर्वेत शांतता प्रक्रिया सुरळीत होत असताना आता चीन आणि तैवान मधील संघर्ष विकोपाला जात आहे आणि तैवान प्रश्नावर ध्रुवीकरणाची प्रक्रिया अटळ स्वरूपात दिसत आहे. त्याबरोबरच जसा हा संघर्ष विकोपाला जाईल तसे जागतिक शांतते पुढे नवे प्रश्न उभे राहतील. जर साम्राज्यवादी लाल चीनने तैवांवर हल्ला करून तो गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला तर जपान या युद्धात तैवानच्या बाजूने उडी घेईल असा इशारा जपानच्या पंतप्रधान साने ताकाची यांनी दिला आहे. अमेरिकेसारख्या देशाचा तैवानला पाठिंबा असणे उघड आहे आता या पार्श्वभूमीवर जगातील लोकशाही राष्ट्रे एकत्र आली आणि ती चीनच्या विरोधात उभी राहिली तर संघर्षाला अधिक धार चढू शकते. या अनुषंगाने तैवानचा प्रश्न काय आहे व तो कसा सोडविता येईल याबद्दल विचार करणे उपयुक्त ठरेल.

### सुंदर बेटावरचे जग

तैवानचे भू राजनैतिक स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. हा देश मेन लँड चायना पासून सागर सीमेने थोडासा तोडला गेला असला तरी इतिहास संस्कृती आणि धर्म जीवन या सर्व बाबतीत तो मुख्य चीनशी समांतर असा आहे. पण दोघांची राजकीय प्रकृती मात्र भिन्न आहे. १९११ च्या डबल टेंथ क्रांतीनंतर तेथे निर्माण झालेल्या लोकशाही प्रजासत्ताकाचे अध्यक्ष होते डॉक्टर सनयतसेन. त्यांनी लोकशाहीचे तीन तत्त्वे सांगणारे एक व्याख्यान कॅण्टन येथे दिले होते, त्यामध्ये त्यांनी चीनला लोकशाही राष्ट्रवाद आणि लोकांच्या जीवनचरित्रार्थाची गरज असल्याचे सांगितले होते, आशियाई देशातील लोकशाहीभिमुख झाले पाहिजेत. त्यांना लोकशाही प्रथा परंपरांची आणि मूल्यांची ओळख करून दिली पाहिजे, तसेच चीन हा वाळूच्या ढिगाऱ्यासारखा आहे त्याला राष्ट्रवादीच्या भक्कम सिमेंटने बांधण्याची गरज आहे. तसेच लोकांचे जीवन सुखी व समृद्ध व्हावे म्हणून अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करणे आवश्यक आहे. असे त्यांचे प्रतिपादन होते त्याने स्थापन केलेला कमिंग टांग म्हणजे चिनी राष्ट्रवादी पक्ष हा याच तत्त्वावर आधारित होता. डॉक्टर सन यांच्या अकाली निधनानंतर पक्षाची सूत्रे चियांकाई शेख या लष्कर प्रमुखांनी हाती घेतली. पुढे चैन काही शेख राजवटीत सामान्य जनतेवर जुलूम आणि अत्याचार वाढले. तेव्हा प्राध्यापक सेंटर डॉक्टर होशी आणि मावस हेतून यांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. पुढे १९३४ साली माऊ यांनी सबंध चीन भर लॉन्ग मार्च काढला ही मोठी मोहीम चीनच्या ११ प्रांतातून गेली उत्तर ८१ पासून ते दक्षिणेत सेल्सिपर्यंत ही लाखो लोकांची यात्रा पोचली आणि चीनमध्ये कम्युनिस्ट विचारांचा प्रसार झाला श कॉमिंग टांग या पक्षाचे सर्वे सर्वा ही अंकाई शेख यांना जीव वाचविण्यासाठी तैवान किंवा फारसा या बेटावर पळून जावे लागले. १९४९ यावर्षी मेन लँड चायना हा साम्यवादी देश बनला आणि तैवान हा लोकशाही देश म्हणून वावरू लागला. दोघांची राजकीय प्रकृती आरंभापासूनच भिन्न होती आणि आजही ते भिन्नच आहे पण एक चीन या धोरणानुसार मेन लँड मध्ये असलेल्या पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना म्हणजे साम्यवादी सरकारला असे वाटते की दोन्ही चीनचा मिळून एकच चीन झाला पाहिजे आणि अखंड चीनचे हे स्वप्न साकार करण्यासाठी चीनचे अध्यक्ष ही जिनपिंग हे एकत्र करणाची भाषा बुलंदपणे बोलत आहेत. आणि त्याला खुद्द तैवान मध्ये आणि जगातील लोकशाही देशांमध्ये सुद्धा तीव्र विरोध होत आहे. तैवानचे सुंदर बेट आता संघर्षाच्या वादळात सापडले आहे आणि त्याचे भवितव्य अंधकारमय बनले आहे वारंवार होणाऱ्या कवायती लढाऊ विमानांच्या घीरट्या आणि सतत आक्रमणाच्या धमक्या यामुळे तैवान मधील सामान्य माणूस त्रस्त झाला आहे.

### शिगेला पोहोचला संघर्ष

नवीन शताब्दीच्या दुसऱ्या दशकात तैवान आणि चीनमधील संघर्ष शिगेला पोहोचला आहे विशेषतः लष्करी धमक्या आणि कारवाईची टांगती तलवार यामुळे या संघर्षाला




आजवरच्या इतिहासात या दशकातील सर्वोच्च तणावाचा उच्चांकबिंदू म्हटले जात आहे. सबंध जगाचे पुन्हा एकदा साम्यवादी आणि साम्यवादाच्या विरोधातील लोक भांडवली लोकशाही राष्ट्रे यांच्यात तीव्र ध्रुवीकरण संभवत आहे. आणि दोन्ही बाजूंनी कठोर राजकीय भूमिका घेतल्यामुळे या संघर्षाचे पर्यवसान प्रथम युद्धामध्ये आणि नंतर जागतिक महायुद्धामध्ये होते की काय अशी भीती वाटू लागली आहे.

१९४९ नंतर चीनने जशी प्रगती केली किंबहुना त्यापेक्षाही अधिक विज्ञान तंत्रज्ञान माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता अशा अनेक क्षेत्रात चिमुकल्या तैवाने मोठी झेप घेतली आहे. आज जगातील सेमीकंडक्टर उद्योगात तैवान सर्वात पुढे आहे, आणि त्याने लाल चीनला केव्हाच मागे टाकले आहे. चीन ज्याला न्याय अभियान म्हणतो त्यानुसार २०२६ मध्ये तैवानला भीती दाखवण्यासाठी लष्करी कवायती, हवाई उडाने आणि आक्रमणाची भीती दाखविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आतापर्यंतचा चीनचा हा तैवान विरोधात सर्वात मोठा आक्रमक लष्करी पवित्रा आहे, अलीकडे केलेल्या सरावा मध्ये त्यांनी पूर्णपणे नौदल आणि आरमारी शक्तीचा उपयोग केला आहे आणि बेट राष्ट्राला घेराव करण्याचाच जणू प्रयत्न केला आहे.

### चीनची वाढती घुसखोरी


अलीकडच्या काळातील आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांच्या बातम्यांचा अभ्यास केला असता असे दिसते की लाल चीनची तैवान मधील घुसखोरी वाढत आहे. ३० डिसेंबर २५ रोजी चीनने तैवानभोवती पुन्हा एकदा गळफास आवळला आणि १३० किलोमीटर लष्करी विमाने आणि डझनभरापेक्षा अधिक नौदल जहाजे यांचा उपयोग करून त्या देशावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. एकाच दिवसात मध्यम रेषा ओलांडणारी ९० विमाने समाविष्ट करण्यात आली होती २०२२ नंतर चीनने केलेली ही दुसरी सर्वात मोठी घूसखोरी म्हणून नोंदविण्यात आली चीनच्या या आक्रमक हालचाली आणि घूसखोरी पाहता त्याचा निषेध जपान सारख्या आशियातील बलशाली देशाने केला आहे. आणि चीनने जर प्रत्यक्ष युद्धाचे रणशिंग फुंकले तर जपान तैवानच्या बाजूने उडी घेण्यास तयार आहे, त्यामुळे संघर्ष कसा पसरत आहे हे लक्षात येते.

### चीनची नवी व्यूहरचना

लाल चीनची नवी रणनीती ही भीती दाखवा आणि घाबरून टाका अशी आहे. ग्रेझोन रणनीती वापरण्यास प्रारंभ केला आहे, त्यामध्ये थेट तैवान वरून उंचावरचे फुगे उडविणे आणि संवेदनाशील तैवाने लष्करी तळांचे उच्च रिझर्वेशन ड्रोनचा उपयोग करून आक्रमक प्रतिमा उभी करणे इत्यादी तंत्रांचा त्या समावेश आहे. चीनच्या या वाढत्या कुरापती सामान्य तैवान नागरिकाला अस्वस्थ करणारे आहेत. त्याची झोप उडविणारे आहेत तैवानचा निर्धार आणि आत्मविश्वास याचे खच्चीकरण करण्याचा चीनचा या नव्या धोरणानुसार डाव आहे. पण तैवान येथील माणसाची इच्छाशक्ती आणि महत्त्वाकांक्षा तसेच त्यांचा आत्मविश्वास जबरदस्त आहे आतापर्यंत तैवान मधील कुठल्याही लोकनियुक्त सरकारने लाल चीन पुढे नांग्या टाकलेल्या नाहीत. हे विशेषत्वाने नमूद केले पाहिजे. त्यामुळे चीनच्या या नव्या भीती दाखविण्याच्या राजनीतीचा पर्दाफाश करण्यात तैवानचे नेते यशस्वी झाले आहेत. असेच म्हटले पाहिजे शिवाय जगातील सर्व लोकशाही राष्ट्रीय तैवानच्या पाठीशी उभे असल्यामुळे तैवानला चीनच्या कोणत्याही राक्षसी आक्रमण कारवायाची भीती वाटत नाही.

### तैवानचे भक्कम नेतृत्व

तैवानची सर्वात जमेची बाजू कोणती असेल तर तेथील भक्कम नेतृत्व ही होय. मागील ७५ वर्षात तैवान मध्ये लोकशाही रुजली आहे आणि ती जीवनाचा मार्ग बनली आहे, तेथील सर्वच निवडणुका या शांततेने आणि अहिंसक मार्गाने होतात आणि लोक भरभरून मतदान करतात. आणि आपल्या पसंतीचे सरकार निवडतात. बहुपक्षीय राजवट आणि लोकांना असलेले स्वातंत्र्य यामुळे दैवान मध्ये लोकशाहीची ध्वजा उंच उंच फडकत आहे, सध्याचे तैवानचे राष्ट्राध्यक्ष विल्यमलाई हे मे २०२४ पासून या पदावर आहेत त्यांच्या म्हणण्यानुसार तैवान हे अगोदरच एक सार्वभौम मुक्त लोकशाही राष्ट्र आहे. आणि त्याचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित आहे. त्यांच्या मते तैवान मधील जनता स्वतःचे नेतृत्व करण्यास समर्थ आहे. स्वतःला पीपल्स रिपब्लिक म्हणून घेणाऱ्या लाल चीनला उगाचच तैवानचे नेतृत्व करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज नाही. **(क्रमशः)**




## जात्यावरच्या ओव्या......

गायी गेल्या रानात
गोठा हलका हलका
परतल्या संध्याकाळी
झाला गलका गलका ||४४२||

गाय आली हंबरत
जणू हाका मारे माय
वळखून वासराला
पाजायला उभी राह्य ||४४३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## समर्थांच्या घरी...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

शुचिर्भूत होऊन आम्ही समर्थ मंदिरात दर्शनासाठी गेलो. समर्थांच्या जन्मस्थळाची स्मृती म्हणून हे मंदिर उभारले आहे. मंदिरात समर्थ रामदासांची देखणी मूर्ती आहे. १९३२ मध्ये श्रीसमर्थ मूर्तीची प्राणप्रतिष्ठा एका भव्य सोहळ्याने करण्यात आली. सभामंडपात एका बाजूला त्यांची प्रतिमा लावली आहे तर दुसऱ्या बाजूला समर्थ रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराज एका प्रतिमेमध्ये दिसतात. मंदिराचा सभामंडप भव्य आहे. त्यामध्ये समर्थांच्या जीवनातील प्रसंगांची चित्रे लावलेली आहेत.



या परिसरात आपण आलो की समर्थांच्या चरित्रात वाचलेले त्यांच्या लहानपणीचे प्रसंग जणू जिवंत होतात. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत आपण आलो आहोत याचा खूप आनंद वाटतो. श्रीरामांची उपासना मारुतीची उपासना आणि सूर्याची उपासना ज्या घराण्यात होत होती अशा ठोसर (कुलकर्णी) घराण्यात समर्थ रामदासांचा जन्म झाला. त्यांचे वडील सूर्याजीपंत आणि आई राणूबाई या सज्जन, सदैव भक्तिमार्ग आणि परोपकारात रत असलेल्या दांपत्याच्या पोटी समर्थ रामदासांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव नारायण असे होते आणि त्यांचे जेष्ठ बंधू गंगाधर उर्फ श्रेष्ठ हे होते.

हाच तो परिसर की ज्या ठिकाणी समर्थ रामदास लहानपणी मित्रमंडळी जमवून नाना प्रकारचे खेळ खेळले, तेथील रानावनात ते हिंडले, झाडांवर चढले, झाडांवरून भिंतीवर उड्या मारल्या, शस्त्रे चालवण्याचा सराव केला, घोड्यावरून रपेट केली. या त्यांच्या बाललीला याच परिसरात घडल्या.

समर्थ नेहमी बाहेर हिंडत असायचे आणि घरात त्यांचा वावर कमी म्हणून एकदा आई त्यांना म्हणाली की नारायणा, अरे तुझा भाऊ गंगाधर तुझ्यापेक्षा फक्त तीन वर्षांनी मोठा आहे तरी तो कुळकर्णीपणाचे काम पाहतो. तू थोडा तरी घराकडे पहात जा, प्रपंचाची चिंता कर. हे ऐकल्यानंतर नारायण स्वतःच्या मनाशी विचार करू लागला आणि तिथेच असलेल्या एका अळगळीच्या खोलीत जाऊन चिंतन करीत बसला. कित्येक तास गेले तरी तो कोणाला दिसला नाही. त्यांची आई जेव्हा काही कामानिमित्त त्या खोलीत केली तेव्हा आईने त्यांना विचारले की नारायणा, इथे काय करतो आहेस रे ? तेव्हा ते उतरले,'' आई चिंता करितो विश्वाची.'' आईने सांगितले होते प्रपंचाची चिंता करायला आणि लहानग्या नारायणाला पडली होती विश्वाची चिंता. ही चिंता त्याने आयुष्यभरच केली आणि जगाच्या कल्याणासाठीच आपले आयुष्य वेचले. '' आई चिंता करितो विश्वाची,'' हे त्यांचे बोल अजूनही या परिसरात घुमत आहेत की काय असे वाटते. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏

## दासबोध स्तवन




उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## चतुर्दशब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

२) विरोधकांनी निर्माण केलेले आक्षेप फेडले म्हणजे आ पला मुद्दा मांडण्याचा मार्ग मोकळा होतो त्याला सिद्धांत म्हणतात. चौदा ब्रम्हे हा पूर्वपक्ष असून शुध्द ब्रम्ह हा सिध्दांत आहे. जे खोटे आहे त्याचे प्रथम सविस्तर विवेचन करावे. त्यामध्ये जे दोष आहेत ते बाजूला काढावेत. त्यानी होते काय की जे खरे आहे ते आपोआपच अंत:करणात ठासून रहाते.

चौदा ब्रम्हांची नावे

१) शब्दब्रम्ह, २) ॐ कार, एकाक्षर ब्रम्ह यालाच मितिकाक्षरब्रम्ह असेही म्हणतात., ३) खंब्रम्ह
४) सर्व ब्रम्ह, ५) चैतन्यब्रम्ह, ६) सत्ता ब्रम्ह
७) साक्षब्रम्ह ८) सगुणब्रम्ह ९) निरगुण ब्रम्हत्र
१०) वाच्यब्रम्ह ११)अनुभव ब्रम्ह १२)आनंदब्रम्ह
१३)तदाकारब्रम्ह १४)अनिर्वाच्यनिरूपण
हीचौदा ब्रम्ह आहेत.

आपण आतापर्यंत १४ ब्रम्हाचा अभ्यास केला. आता पुढे समर्थ सांगतात की प्रत्येक ओवीचे शब्दांकन वेगवेगळे आहे. त्याचे शब्दपांडींत्य ओवीनुसार आपण अभ्यासु.


शब्दब्रम्ह – स्वस्वरूपाचा साक्षात अनुभव नसुन नुसत्या शब्दांनी ते असे आहे तसे आहे म्हणून सांगणे. स्ववस्तूबद्दल जेथे नुसते शब्दपांडित्य असते ते शब्दब्रम्ह होय. तेथे त्यास्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव नसतो. ते मायेच्या कक्षेतच मोडते. शाश्वताचा विचार नसतो.जी सद्वस्तु शब्दाने सांगता येत नाही तिचे वर्णन करण्यास शब्दांची करामत करणे म्हणजे सांगणारा ऐकणारा दोघेही भ्रमात वावरतात अशाश्वतात शब्दरूपाची करातम करतात.

एकाक्षरब्रम्ह – ॐ या एकाक्षराने दर्शित ब्रम् ते मितिकाक्षरब्रम्ह होय. सद्वस्तु विनाशी नाही तशीच अविनाशी नाही. ती नुसती आहे. म्हणून ती एका मोजक्या अक्षराने वर्णन करण योग्य नाही. अक्षर ही मानवी कल्पना असल्याने तेथे शाश्वताचा विचार नसतो.

खब्रम्ह – खब्रम्ह म्हणजे आकाश तेच ब्रम्ह होय.असे श्रुती वचन आहे. आकाश शुन्यरूप आहे. ब्रम्हज्ञानाने शुन्य नाहिसे होते.

**(क्रमशः)**

## परमेश्वराची खरी पूजा



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ' मी साधन करतो ' असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ' रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ' सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ' रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ' असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

*अभंग ७*

*मूळ ना डाळ शाखा ना पल्लव ।*
*तो हा कैसा देव आलां घरीं ॥१॥*
*उभा सगुणपणें शोभा ।*
*जिवाशिवा प्रभा दाविताहे ॥ध्रु०॥*
*नकळे याची गती नकळे याची लीळा ।*
*आपिआप सोहळा भोगीतसे ॥२॥*
*ज्ञानदेव म्हणे न कळे याची थोरी ।*
*आपण चराचरीं नांदतसे ॥३॥*

*अर्थ:-*

*ज्याला मूळ नाही फांद्या व पान नाहीत असा वृक्षस्वरुप देव आमच्या घरी आहे. तो निर्गुणपणात उभा राहुन सगुणपणे शोभा दाखवतो व त्याची प्रभा जीव शिवावर पसरली आहे. त्याची गती कळत नाही त्याच्या लीला समजत नाहीत तरी तो सगळे सोहळे भोगतो आहे. माऊली ज्ञानेश्वर बोलतात त्याची थोरवी कळत नाही तरी तो आपण होऊन सर्व चराचरात नांदत आहे.*

*अभंग ८*

*निळिये मंडळीं । निळवर्ण सांवळी ।*
*तेथें वेधलिसे बाळी । ध्यानरुपा ॥१॥*
*वेधु वेधला निळा । पाहे घननीळा ।*
*विरहणीं केवळा । रंग रसनें ॥ध्रु०॥*
*नीळवर्ण अंभ । नीळवर्ण स्वयंभ ।*
*वेधें वेधु न लभे । वैकुंठींचा ॥२॥*
*ज्ञानदेव निळी । हृदयीं सांवळी ।*
*प्रेमरसें कल्लोळीं । बुडी देत ॥३॥*

*अर्थ:-*

*निलवर्ण आकाशा सारखा सावळा पण निळी झाक असलेला कृष्ण बाल्यावस्तेत पाहिल्यावर त्याच्या दर्शनाचे वेध लागले. त्या आकाशीच्या निळेपणाला पाहुन त्या घननिळाचे वेध लागलेली विरहिणी त्याचे नामस्मरण तोंडाने करु लागली. तो घननिळा व त्या निळ्यारंगात रंगलेली विरहिणी मात्र तो वैकुंठाचा निळा भेटत नाही त्याचे तिला वेध लागले आहेत. त्या निलवर्ण असलेल्याला माझ्या हृदयात त्याच निळ्यारंगाने रंगुन त्यात प्रेमरस कल्लोळ करुन बुडी दिली असे माऊली सांगतात.*



## आरोग्य संजीवनी

## हिवाळ्यात काय खावे व काय खाऊ नये

ज्योतिर्मय साहित्य

रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे:

आले (अदरक) आणि सुंठ (सुके आले): आल्याचा चहा, डाळी आणि भाज्यांमध्ये आल्याचा वापर करा. सुंठ पावडर (गूळ आणि तुपासोबत) थंडीशी लढण्यासाठी उत्तम आहे.

हळद: हळद आणि आल्याचे दूध पिणे फायदेशीर ठरते.

काढा: आले, लवंग, दालचिनी, काळी मिरी, वेलची आणि तुळस घालून केलेला काढा रोगप्रतिकारशक्ती वाढवतो.*

दही/ताक आणि आंबवलेल्या भाज्या (): (जसे की किमची) हे प्रोबायोटिक्सचे उत्कृष्ट स्रोत आहेत, जे पचन आणि रोगप्रतिकारशक्ती सुधारतात.

गरम सूप: भाज्यांचे गरम सूप, टोमॅटो सूप किंवा डाळीचे सूप शरीराला प्रथिने आणि उब देतात.

कोमट पाणी किंवा हर्बल टी:* यामुळे पचन चांगले राहते आणि शरीर हायड्रेटेड राहते.

हिवाळ्यात काय खाऊ नये ( )*

काही पदार्थ थंडीत शरीरासाठी योग्य नसतात आणि सर्दी-खोकल्याचा त्रास वाढवू शकतात.

जास्त थंड पदार्थ आणि पेये:*

आईस्क्रीम आणि कोल्ड्रिंक्स: कडाक्याच्या थंडीत थंड पेये पिणे किंवा आईस्क्रीम खाणे शरीरासाठी योग्य नाही. यामुळे घसा चिघळू शकतो आणि सर्दी-खोकला वाढू शकतो.

थंड दही आणि थंड दूध: हे पदार्थ टाळावेत, कारण ते सर्दी वाढवू शकतात. कोमट दुधाचे सेवन करा.

पचायला जड आणि तेलकट पदार्थ:

तळलेले पदार्थ भजी, समोसा, वडापाव यांसारखे तळलेले आणि जास्त तेलकट पदार्थ पचायला जड असतात. यामुळे पोटात जळजळ, अपचन आणि वजन वाढू शकते.

बेक्ड फूड ( ): यांचा मर्यादित वापर करावा. शक्यतो टाळणे उत्तम.

जास्त गोड पदार्थ ( ): जास्त साखरेचे पदार्थ टाळावेत.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

बदामाचे फायदे-

१. भिजवलेले बदाम सकाळी खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम हे जास्त पौष्टिक असतात.

२. बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपतांना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

३. बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

४. डाएटिंग करणारी लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करते.

५. बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

६. मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेवल नियंत्रणात राहते.

७. संशोधनादरम्यान स्पष्ट झालं की, दररोज मुठभर बदाम खाल्ल्यास हृद्याचे आजार कमी होतात. बदाम खाल्ल्यानं हृदयाच्या रक्तवाहिन्यांचा रक्तप्रवाह नीट होतो. ८. बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते. जे रक्त शुध्दीकरण करण्यास उपयुक्त ठरते. ९. बदामामुळे कोरडी त्वचा असणाऱ्यांना त्वचेचा स्निग्धपणा वाढवण्यास मदत होते. १०. बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.



## लघु बोधकथा

◆दानाचे महत्व◆

*हजरत उमर आपल्या रयतेची खूप काळजी घेत असत. ते स्वत:ची व आपल्या परिवाराची चिंता नकरता जनतेचे दु:ख निवारणार्थ झोकून देत. एका प्रसंगाची गोष्ट आहे, काही कारणाने राजधानीत आग लागली, आग इतक्या वेगाने पसरली की तिने शहराचा अर्धा भाग व्यापून टाकला. लोकांनी खूप पाणी टाकले पण आग आटोक्यात येण्याची काही चिन्हे दिसेनात. हजारो लोकांची घरे, दारे, पिके सगळे जळून खाक झाले. मनुष्यहानीही मोठया प्रमाणावर झाली. लोकांचा आक्रोश वाढत होता. आगीचा वणवा पसरतच चालला. आगीचे लोळ भडकत चालले. शेकडो घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडत होती. जनतेला एकाच भयाने ग्रासले होते. आग आटोक्यात कशी आणायची कशी, आग विझत नसल्याने लोकांनी हजरत उमरला उपाय विचारले, तेसुद्धा आग विझविण्यात तनमनधनाने व्यग्र होते. उमरनी लोकांना सांगितले, "ही आग म्हणजे खुदाचा कोप असावा, तुम्ही लोकांनी आता आग विझविण्यासाठी पाणी टाकण्याचे काम सोडा, गरिबांना अन्नदान करा. कदाचित खुदा यामुळे प्रसन्न होईल आणि आगीपासून आपली सुटका करेल." जनतेतील लोक म्हणाले,"हजरत साहेब आपण धर्मादाय संस्थेचे सर्व दरवाजे सगळ्यांसाठी आधीच उघडे ठेवलेले आहेत. कोणीही गरीब आमच्याकडे आला तर आम्ही त्याला दान करतोच. मग आमच्यावर तो नाराज कसा" हजरत उमरने समजावले, "तुम्ही जे दान करता त्यामागे निष्काम भावना नाही. तुम्हाला वाटते दानाचे पुण्य म्हणून तुम्हाला सन्मान किंवा प्रशंसा हवी असते. या देखाव्याला पुण्यकर्म म्हणत नाहीत. हजरत उमरच्या खुलाशानंतर जनतेने आपली चूक सुधारली अन आश्चर्य म्हणजे आग पूर्णपणे विझून गेली. जनतेने खुदाचे व हजरत साहेबांचे आभार मानले.*

*तात्पर्य:- नि:स्वार्थ भावनेने केलेले दान कधीही लोकांच्या अंतरात्म्यापर्यंत पोहोचते.*

# नातं (भाग २)

**ज्योतिर्मय साहित्य**

अर्चना भावनिक होऊन गळ्यात पडल्याने आनंद एकदम बावरला,अर्चना स्वतःला सावर असे म्हणत तिला हळूच त्याने बाजूला केले,पण तिचे हुंदके काही थांबत नव्हते. तिच्या मनात विचारांचे प्रचंड वादळ घोंगावत होते. आपली मैत्रीण मधुरा गेल्याचे दुःख होतेच पण आपला पती अंकुश गेल्याने ती पूर्ण एकटी पडली होती.

आता मी एकटी कश्याला जगू ? असा विचार तिच्या मनात अधून मधून येत होता पण आपली एकुलती एक कन्या जपान मध्ये आहे आणि तिला या जगात तिचा पती व मी या शिवाय कुणी नाही याची जाणीव होती, त्यामुळे ती आत्महत्या या विचारपासून परावृत होत होती पण इकडे भारतात मी एकटी कशी जगू? हा विचार तिला पुन्हा पुन्हा भेडसावत होता.

त्यात जरी स्वतःची पन्नाशी उलटली तरी तिचे ते देखणे रूप, अजूनही तसेच होते, अगदी एखादया तरुणीला ही लाजवेल असेच. आनंद पुन्हा म्हणाला, अर्चना स्वतःला सावर,



खूप झाले आता, आज माझ्या मधुराचा वाढदिवस आहे,त्या करिता तू मला भेटायला आणि तिचा वाढदिवस साजरा करायला आली आहेस, हे विसरू नकोस.

आता मात्र हळूहळू अर्चना सावरली. तिने. वॉश बेसिनकडे जाऊन. चेहरा धुतला, आनंद ही त्या आधी आपल्या चेहऱ्यावर पाणी मारून फ्रेश झाला होता.

दोघांनी मग आनंदाने केक खाल्ला. बघता बघता रात्रीचे नऊ वाजत आले होते. आनंद अर्चनाला म्हणालाआता तू जेवण करूनच जा आपण मधुराच्या वाढदिवसानिमित एकत्र जेऊ. पण अर्चना म्हणाली, नको नको, मी इतक्या उशीरा तुमच्या सोबत बाहेर हॉटेल मध्ये येत नाही जेवायला. तेंव्हा आनंद म्हणाला, मी हॉटेल मधून घरीच जेवणाची ऑर्डर देतो आहे आणि त्याने आर्डर दिली. जेवण घरी येई पर्यंत रात्रीचे दहा वाजून गेले. मग ती दोघे जेवायला बसली. आनंदने साधेच जेवण म्हणजे वरण भात बटाटा भाजी मसाले भात आणि गोड असावे म्हणून थोडी बासुंदी ऑर्डर केली होती. अर्चनाने जेवायचे ताट डायनिंग टेबल वर वाढून घेतले. आणि बासुंदीचा डबा उघडताच, त्या सुवासाने ती पुन्हा आठवणीत गेली.



गिरीश खं. वसेकर, पुणे
94226 59400

अंकुशला अशी सुवासिक सुंदर बासुंदी खूप आवडायची. आणि पुन्हा तिच्या डोळ्यात आसवांनी गर्दी केली. अर्चना, काय झाले तुला पुन्हा? असे विचारत आनंद कोड्यात पडला.

इतक्यात आनंदच्या फ्लॅटची बेल वाजली इतक्या उशीरा कोण आले असेल ? आपल्या दोघांना बघून त्याला काय वाटेल? हा विचार करतच आनंद दार उघडायला गेला. आणि.... **(क्रमशः)**

# तरल भावनांचा अविष्कार म्हणजे बाप, द रिअल हिरो-सुनिल लांजेवार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - तरल भावनांचा अविष्कार म्हणजे बाप, द रिअल हिरो असे मत काव्यसंग्रहाच्या विमोचनप्रसंगी छत्रपती संभाजीनगर एसआयडीचे डेप्युटी कमिशनर सुनिलजी लांजेवार यांनी व्यक्त केले. कवितासंग्रह वाचत असतांना आपण अंतर्मुख होतो. वडीलांच्या जगण्यातील वास्तव काव्यसंग्रहात प्रकर्षाने जाणवते. हेच काव्यसंग्रहाचे यश म्हणावे लागेल. तसेच मराठवाड्यात साहित्य आणि संस्कृती पध्दतशीरपणे बाजूला सरकवली जाते. वाचनसंस्कृती लोप पावत चाललेली आहे. त्यातच वाचनसंस्कृती जिवंत ठेवण्याचे काम, लेखक, कवी घडविण्याचे काम, पुस्तक प्रकाशनाच्या माध्यमातून काही प्रमाणात बाबा चन्ने सारखे माणसं करत आहे. ही विशेष बाब म्हणावे लागेल. असे ही डेप्युटी कमिशनर सुनिल लांजेवार बोलताने पुढे म्हणाले.

तसेच उच्च न्यायालयाच्या सहसचिव ॲड. शुभांगी मोरे पाटील यांनी काव्यसंग्रहावर भाष्य करतांना सर्वच कविताचे पदर उलगडून दाखवले. त्यांनी बोलताने वैशाली कलमानी यांच्या कवितांचा आवर्जून विशेष उल्लेख केला. झाले आज मी पोरकी, तुझ्याविना शुन्य... शुन्य... या दोन ओळी स्पष्ट करतांना सर्वच सभागृहात अश्रू तरळलेले दिसून आले होते. कविताची ताकद काय असते हेच या माध्यमातून दिसून आले. ॲड. मोरे यांनी काव्यसंग्रहावर विस्तृत असे भाष्य करून सभागृहातील मान्यवरांच्या डोळ्यात अनेकदा अश्रू दिसले. त्याप्रमाणे कवयित्री कल्पना रविंद्र बनसोड यांनी देखील काव्यसंग्रहाचा उलगडा आपल्या शैलीत करून दिला. ग्रामीण बापाच्या कष्टाचे विवेचन काव्यसंग्रहात दिसून येते, असेही त्या बोलताने म्हणाल्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामीण साहित्यिक तथा संपादक बाबा चन्ने यांची उपस्थिती होती.

विमोचनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात जेष्ठ कादंबरीकार उत्तम बावस्कर यांनी बापाविषयी अनेक दाखले देत एक अभ्यासपूर्ण मत मांडलं. साहित्य संस्कृती जिवंत असणे हीच काळाची गरज आहे. असेही ते आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलले. तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून बापाविषयी कविता लिहणाऱ्या प्रत्येकाचे आपल्या बापाविषयीच्या भावना आपल्या शैलीत व्यक्त केल्या.

बाप, द रिअल हिरो या कवितासंग्रहात सोळा कवयित्रीच्या प्रत्येकी पाच अशा एकूण ऐंशी कविता असून या काव्यसंग्रहाचे संपादन सौ. कोमल अक्षय मनाळ-मलिक व सौ. जयाबाई विनायक घुगे-मुंडे यांनी केले असून यात प्रामुख्याने श्रीम. जयश्री औताडे-गायकवाड, श्रीम. जयश्री अविनाश जगताप, श्रीम. वैशाली शंकर कलमानी, सौ. अनुराधा काशिनाथ मोतेवार, सौ. आशा कोवे-गेडाम, सौ. वर्षा चिमणाजी केंद्रे-मुंढे, सौ. प्रतिक्षा जाधव-निकम, द्वारकाकन्या ॲड. वैष्णवी मनाळ, कु. राजश्री विपिन साळे, कु. आराध्या गणेश जिवरक, कु. सरस्वती मनोज वाकळे, श्रीम. कोमल मनोज आधुडे-चन्ने, सौ. आम्रपाली अनिल घाडगे व सौ. प्रतिमा किशोर साळुंखे या कवयित्रीला काव्यसंग्रहात सहभाग आहे.

या कार्यक्रमासाठी साहेबराव चन्ने, रंजना चन्ने, नारायण औताडे, काशीबाई औताडे, विनायक घुगे, अशोक बिराजदार, रामचंद्र विश्वनाथ भोसले, प्रभाकर माधवराव मलिक, सीताराम माधवराव मलिक, सिंधुबाई प्रभाकर मलिक, सुनिता सीताराम मलिक, कृष्णा आसाराम मलिक, भगवानराव हिवाळे, योगिता हिवाळे, कविता हिवाळे, कावेरी गवळी, बाळकृष्ण गवळी, रंजना रामचंद्र भोसले, प्रसन्न अविनाश जगताप, गणेश मनाळ, वैशाली मनाळ, व्दारका विठ्ठल मनाळ, अक्षय मनाळ, मनोज वाकळे, प्राजक्ता कलमानी, गेडाम सर, सानिया कलमानी, कृषीसहायक दिपक कुचेकर, डॉ. आण्णा चन्ने, राहु नाना चन्ने, नवनाथ चन्ने, पमाबाई आधुडे, अनिता डमाळे, सविता जिवरख, मनिषा आवारे, रविंद्र डमाळे, गणेश जिवरख, डॉ. संकेत चन्ने, मंगल चन्ने, रेखा चन्ने, सचिन आवारे, रोहित साळे, प्रयास मोतेवार, अविनाश मोतेवार, विजयमाला मोतेवार, दिव्या कोटगिरे, ज्ञानेश्वर भावठाने अर्चना गुर्दे, रावसाहेब गुर्दे, अर्नव गुर्दे यांच्यासह शेकडो वाचक हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोमल अक्षय मनाळ-मलिक व जयाबाई विनायक घुगे-मुंडे यांनी केले तर उत्कृष्ट असे सुत्रसंचालन ॲड. वैष्णवी मनाळ यांनी केले.



# साहित्य भारती आयोजित साहित्योत्सव संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - साहित्य भारती आणि स. भु. शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने २१, २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या साहित्योत्सवाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवारी, ९ जानेवारी २०२६ रोजी ज्येष्ठ विचारवंत ज्ञानप्रकाश मोदाणी यांच्या हस्ते झाले. शारदा मंदिर कन्या सरस्वती प्रशाला परिसरात संपर्क कार्यालय उघडण्यात आले आहे.

मोदाणी व अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर साहित्योत्सवाचे निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह आर्कि. डॉ. अनिरुद्ध नाईक, साहित्य भारतीचे प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी बोलताना मोदाणी यांनी युवा साहित्यिकांना संधी देण्यासाठी साहित्य भारतीने आयोजित केलेला उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद केले.






# तिरुपती बालाजी

**ज्योतिर्मय साहित्य**

आज आपण भारतातील सर्वात धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचे असलेले तीर्थस्थान, म्हणजे तिरुपती तिरूमला बालाजी मंदिर, या दिव्य स्थळास भेट देणार आहोत.

स्थान : तिरुपती हे आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात येते. आता याला तिरुपती जिल्हा असेही म्हणतात. हे भगवान श्री व्यंकटेश्वर यांना समर्पित मंदिरआहे. हे शेषाचल या सात पर्वत रांगांवर आहे. मंदिराचे व्यवस्थापन तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी)तर्फे करण्यात येते. तिरुपती या शहरा लगत असणाऱ्या शेषाचल पर्वतांच्या माथ्याला तिरुमला म्हणतात. या तिरूमलावरच भगवान श्री व्यंकटेश्वराचे अति प्राचीन आणि भव्य असे मंदिर आहे. या मंदिरास दररोजच हजारोंच्या नव्हे तर लाखोंच्या संख्येत भक्त भेट देत असतात. हे मंदिर जगातील सर्वाधिक दान मिळवणारे मंदिर आहे. मंदिरातील विधी ह्या काटेकोरपणे पहाटेपासून रात्रीपर्यंत पाळल्या जातात. येथे भगवंताची वैखानस आगम पद्धतीने पूजा होते.

मुख्य मंदिर

हे मंदिर तिरुमलाच्या पर्वत रांगेत आहे. हे देऊळ असलेल्या डोंगराला तिरुमला असे म्हणतात. बालाजी ची मूर्ती ही दोन मीटर उंचीची आहे. आणि ती स्वयंभू आहे, असे मानण्यात येते. हे मंदिर किमान २००० वर्षे जुने आहे. पल्लव राणीने इसवी सन ६१४ मध्ये येथील पहिली वेदी बांधली. संगम साहित्यात (इसवी सन पूर्व ५००) या स्थानाचा उल्लेख आढळतो. चौल व पल्लव राजांनी मंदिराला दिलेल्या योगदानांचे कित्येक पट इथे सापडले आहेत. इसवी सन १५१७ मध्ये कृष्णदेवराय राजाने दिलेल्या दानाने गर्भगृहाच्या शिखराला सोन्याचा थर देण्यात आला. लोकांच्या नित्य दानातून मंदिर अधिकाधिक श्रीमंत होत जात आहे.

दर्शनासाठी लागणारा अवधी

इथे येणाऱ्या भक्तांच्या अलोट गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी विविध प्रकारच्या दर्शनाच्या पद्धती उपलब्ध आहेत. यात फ्री दर्शन यालाच *सर्व दर्शन* असेही म्हणतात यात सर्वसाधारण दिवसांमध्ये दर्शनासाठी दहा ते बारा तास लागू शकतात. तर उत्सवाच्या काळात हा कालावधी पंचवीस तासापर्यंत ही जाऊ शकतो. याशिवाय *स्पेशल दर्शन* हाही दुसरा पर्याय आहे. यात रुपये ३०० किंवा ५०० याची तिकीट काढल्यानंतर दिलेल्या वेळेच्या स्लॉट नुसार दोन ते तीन तासात दर्शन होते. याशिवाय गर्भवती व लेकुरवाळ्या महिला व वृद्ध यांच्यासाठी कमी वेळ लागावा आणि दर्शन व्हावे अशी व्यवस्था आहे. या दर्शनाचे व पूजेचे पास ऑनलाईन जारी करण्यात येतात. याप्रमाणे नियोजन करून मगच तिरुपतीला दर्शनाला जाण योग्य राहील.

**(क्रमशः)**


















# सत्येन (सतीन्द्रनाथ) बोस

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रारंभीच्या सशस्त्र क्रांतीच्या टप्प्यातील एक अत्यंत धाडसी बंगाली क्रांतीकारक होते. ज्यांनी अलिपूर बॉम्ब खटल्यात सरकारी साक्षीदार नरेंद्र गोस्वामी याचा वध करून सत्येन बोस आणि कन्हयालाल दत्त यांनी अरविंद घोष यांच्यासह अनेक क्रांतीकारकांना फाशीपासून वाचवण्यात मोठी भूमिका बजावली. ब्रिटीशांनी २१ नोव्हेंबर १९०८ रोजी सत्येन बोस यांना फासावर चढविले. खुदीराम बोस, कन्हयालाल दत्त यांच्यानंतर प्राणार्पण करणाऱ्या अग्रणी हुतात्म्यापैकी सत्येन बोस यांचे नावाची नोंद भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ऐतिहासिक मानली जाते. फाशी दिली त्यावेळी सत्येन बोस याचे वय फक्त २६ वर्षाचे होते. सत्येन बोस फाशीच्या दिवसापर्यंत अगदी शांत, निडर आणि आपल्या कार्याबद्दल अढळ श्रद्धा ठेवून उभे राहिले. सत्येन बोस यांच्या आईला त्यांच्या फाशीपूर्वी त्यांची भेट घेण्याची इच्छा झाली होती.पण त्यांनी उलट असा निरोप पाठवला की,माझी भेट घेताना एकही अश्रू वाहता कामा नये. ती वीरमाताही धन्य की तिने आपल्या स्वर्गलोकी जाण्यास निघालेल्या पुत्रास हसत-हसत निरोप दिला. सच्च्या स्वातंत्र्यप्रेमाला सीमा नाही. कन्हयालाल दत्त आणि सत्येन बोस या दोघांना तुरुंगात पिस्तुले कशी मिळाली याचा अजुनही जगाला पत्ता लागला नाही.त्या दोघांनी अत्यंत प्रसन्न चित्ताने फाशीच्या खांबाला मिठी मारली. १० नोव्हेंबर १९०८ या फाशीच्या दिवसापर्यंत कन्हयालाल यांचे वजन १६ पौंड वाढले होते. त्यांची स्मशानयात्रा प्रचंड मोठी निघाली. त्यांचे फाशी गेल्यानंतरचे शव तुरुंगाबाहेर आणल्यानंतर वंदेमातरमच्या गगनभेदी गर्जना उठल्या होत्या. त्यांचे चिताभस्म घेण्यासाठी लोकांची अगदी खेचाखेच झाली. कन्हयाललालच्या स्मशानयात्रेचा अनुभव घेऊन,सत्येन बोस यांचा अंत्यविधी बंदीखान्यातच करण्यात आला.खुदीराम बोस, कन्हयालाल दत्तआणि सत्येन बोस हे १९०८ चे तिघे हुतात्मे बंगालमध्ये प्रचंड जनभावना स्वातंत्र्यलढ्यासाठी समर्थन करणारे ठरले. इंदू प्रकाश या वृत्तपत्राने तिघांनाही रोमँटीक आणि धाडसी क्रांतीकारक म्हटले. त्यांच्या बलीदानाने अनुशीलन समितीला नवी प्रेरणा मिळाली आणि सशस्त्र चळवळ मजबूत झाली. सत्येन बोस यांच्या कृतीतून दोन स्तर दिसतात. एकीकडे गुप्त संघटनेचा शिस्तबध्द नियोजित हिंसक ब्रिटीश राजवटीविरुद्ध आक्रमक प्रतिकार आणि दुसरीकडे न्यायालयीन प्रक्रियेला धक्का देऊन ब्रिटिशांनी रचलेला कोर्ट खटला कोसळवण्यासाठी ठरवून केलेली धाडसी कारवाई.अनुशीलन समितीतील अनेक तरुणांसारखेच सत्येन बोस यांचे राष्ट्रवादाचे रूप अत्यंत आक्रमक आणि सशस्त्र होते. कायदेशीर किंवा घटनात्मक मार्गाने ब्रिटिश भारताला स्वातंत्र्य देणार नाहीत यावर सत्येन बोस यांचा विश्वास होता.

सत्येन बोल यांचा जन्म पश्चिम बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यात (आजचा पश्चिम मिदनापूर) ३० जुलै १८८२ रोजी झाला. त्यांचे वडील अभयचरण बोस हे मिदनापूर कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. मिदनापूर शहरांमध्ये १८५० पासून हे कुटुंब स्थायिक होते. अभयचरण बोस यांना पाच मुले आणि तीन मुली होत्या. सत्येन बोस हे अरविंद घोषांचे मावळे भाऊ होते. दोघांच्यात दहा वर्षांचे अंतर होते. बोस कुटुंबाची मूळ उत्पत्ती २४ परगणा जिल्ह्यातील बोरळ गावातील होती आणि हे कुटुंब प्रसिद्ध व्यक्तिमत्व बाबू नंदकिशोर बोस यांचे वंशज होते. बाबू नंदकिशोर बोस हे राजा राममोहन रॉय यांचे अनुयायी आणि ब्राम्हो धर्माचे पहिले सदस्य होते. त्याचे ज्येष्ठ सुपुत्र राजनारायण बोस हे धार्मिक आणि साहित्यिक व्यक्तिमत्व होते. राजनारायण यांनी १८५० चे सुमारास मिदनापुरला स्थलांतर केले आणि ते जिल्हा शाळेचे मुख्याध्यापक झाले. १८६७ मध्ये ते कलकत्याकडे गेले. सत्येन बोस हे १८९७ मध्ये मॅट्रीकची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण होऊन १८९९ साली वडीलांच्या निधनामुळे पुढील शिक्षणासाठी त्यांचे मेव्हणे राधानाथ डेब यांच्याकडे राहिले. सत्येन बोस यांनी प्रवेश परीक्षा (एन्ट्रन्स) आणि



एफ.ए. परीक्षा चांगल्या गुणांनी पार पाडल्या. पण त्यांनी बी.ए.ची परीक्षा दिली नाही. सत्येन बोस यांनी मिदनापुर कलेक्टर ऑफिसमध्ये वर्षभर नोकरी केली. ज्याच्यामुळे त्यांना प्रशासकीय यंत्रणेची माहिती होऊ शकली. या तरूण वयातच बंगालमधील स्वदेशी चळवळ, ब्रिटिशविरोधी वातावरण आणि गुप्त क्रांतीकारी संघटनांचा प्रभाव त्यांच्यावर पडला.





बंगालची फाळणी १९०५ साली करण्यात आली. फाळणीनंतर उसळलेल्या स्वदेशी आंदोलनासोबतच गुप्त व्यायामशाळा, शारीरिक प्रशिक्षण केंद्रे आणि शस्त्र हाताळण्याचे धडे देणाऱ्या संघटनांचा विस्तार झाला. अनुशीलन समिती ही त्यापैकी सर्वात प्रभावी संघटना होती. सत्येन बोस अनुशीलन समितीचे सदस्य झाले आणि याच माध्यमातून पुढे सशस्त्र क्रांतीकारी कारवायांमध्ये सामील झाले. अनुशालन समितीचा मुख्य उद्देश ब्रिटिश सत्तेला सशस्त्र मार्गाने आव्हान देणे, तरूणांना शारीरिक व नैतिक प्रशिक्षण देणे आणि गुप्त स्वरूपात स्वातंत्र्यलढ्याची तयारी करणे असा होता. सत्येन बोस यांनी या संघटनेतून शस्त्र बाळगणे, गोपनीयता राखणे लहान गटांच्या माध्यमातून कारवाया करण्याची तयारी इत्यादी बाबतीत स्वतःला सिद्ध करीत अनुशालन समितीच्या नेतृत्व करणाऱ्या बारींद्रकुमार घोष यांच्याबरोबर ब्रिटीश अधिकाऱ्यांना अद्दल घडविणाऱ्या योजनेत भाग घेतला. सत्येन बोस यांना १९०६ साली मिदनापूर शस्त्रप्रकरणात सुमारे दोन महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.त्यांच्या भावाच्या नावावर परवानाधारक असलेली बंदूक सत्येन बोस यांच्या ताब्यात सापडल्याच्या आरोपावरून त्यांना ही शिक्षा सुनावली गेली. वंग बांधवांनी प्रांताच्या फाळणी विरोधात जोराचे आंदोलन सुरू केले.कर्जनशाहीच्या अंमलबजावणीने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी आटोकाट प्रयत्न ब्रिटिश शासनातर्फे करण्यात आले. ब्रिटिश सरकार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे चळवळ दडपून टाकण्याच्या प्रयत्नांत असतांना तरुण वर्गही पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळाच्या सशस्त्र हल्ल्याच्या मार्गाकडे मोठ्या प्रमाणात आकृष्ट झाला. त्याकाळी कलकत्ता कोर्टाचे न्यायाधीश किंग्ज फोर्ड यांच्या न्यायालयाने प्रचंड प्रमाणात स्वातंत्र्यसैनिकांना शिक्षा देऊन तुरुंगात डांबून अत्याचाराची सीमा गाठली होती. या कोर्टातून निर्दोष सुटणे क्रान्तिकारकांबरोबरच यात गोवण्यात आलेल्या त्यांच्या नातेवाईक व मित्राना अशक्य होऊन बसले होते.क्रांतीकारकांच्या सशस्त्र संघटनांनी किंग्ज फोर्ड यांचा वध करण्याचे ठरविले.

चीफ प्रेसिडन्सी मॅजिस्ट्रेट किंग्ज फोर्ड यांच्या अत्याचारी दमनाने अनुशासन समितीच्या अंतर्गत जुंगातर संघटनेने त्यांना जीवे मारण्याची योजना आखली. संरक्षणाची खास व्यवस्था केलेल्या किंग्ज फोर्ड यांच्या हत्येचा याआधीही प्रयत्न करण्यात आला होता. ३० एप्रिल १९०८ रोजी मुझफ्फरमध्ये किंग्ज फोर्डच्या गाडीवर खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चाकीने बॉम्ब हल्ला केला. पण त्या गाडीत दोन ब्रिटीश महिला मिसेस प्रिंगळ केनेडी आणि त्यांची मुलगी शेरली केनेडी या होत्या आणि त्यांचा या बॉम्ब हल्ल्यात मृत्यू झाला. दोन गाड्या समान होत्या आणि किंग्ज फोर्डच्या दैवयोगाने ते मागच्या गाडीत होते. ब्रिटिश पोलीसांनी खुदीराम बोस यांना वैनी रेल्वे स्टेशनवर पकडले तर प्रफुल्ल चाकीने रिव्हॉल्व्हरच्या गोळीने त्यांना पकडण्यापूर्वी स्वतःवरच स्वतः गोळी झाडून आत्महत्या केली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी खुदीराम बोस यांना फाशी देण्यात आले. जुगांतर संघटनेच्या या योजनेमध्ये सत्येन बोस यांचाही सहभाग होता. या बॉम्बस्फोटाने ब्रिटिश सरकार खडबडून जागे झाले व गुप्तचर विभागाची चक्रे जोराने फिरून बारींद्रकुमार घोष, उपेन्द्रनाथ बॅनर्जी, उल्हासकर दत्त, कन्हयालाल दत्त, हेमचंद्र दास, अरविंद घोष,सत्येन बोस,बाळकृष्ण काणे यांच्यासह ४० पेक्षा जास्त जणांना २ मे १९०८ रोजी अटक करून सर्वाच्यावर खटला भरण्यात आला. यामध्ये निरपराध लोकांचाही भरणा होता.अलिपूर बॉम्ब खटला म्हणून हा खटला प्रसिद्ध असून भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्याची ऐतिहासिक नोंद आहे. अटक सत्रात नरेंद्र गोस्वामी या क्रांतीकारकाचाही समावेश होता. नरेंद्र गोस्वामी हा अलिपूर बॉम्ब खटल्यातील अनुशीलन समितीचा क्रांतीकारक होता. तो बारींद्रकुमार घोष आणि उल्हासकर दत्त यांच्या सोबत क्रांतिकारी कारवायांमध्ये सहभागी होता. १९०५ च्या स्वदेशी चळवळीनंतर बंगालमध्ये अनुशीलन समितीने व्यायाम शाळा आणि गुप्त प्रशिक्षण केंद्रे सुरू केली. त्यामध्ये नरेंद्र गोस्वामी याचा सहभाग होता. बंगाल गव्हर्नर सर अँड्रू फ्रेझवर हल्ल्याचा प्रयत्न, नोव्हेंबर १९०७ मध्ये चंद्रनगरजवळ बॉम्ब ठेवण्याचा अयशस्वी प्रयत्न, डिसेंबर १९०७ मध्ये बॉम्ब लावला पण गव्हर्नर बचावले, यासर्व बाबतीत बारींद्रकुमार घोष, उल्हासकर दत्त यांच्या बरोबर नरेंद्र गोस्वामी होता. अटकेनंतर नरेंद्र गोस्वामी हा २२ जून १९०८ रोजी ब्रिटिशांकडून माफी घेऊन सरकारी साक्षीदार झाला आणि गद्दारी केली. अलिपुर कारागृहात वरील सर्व बंदीत असताना नरेंद्र गोस्वामी कटाची सर्व माहिती सरकारला देऊ लागला. खटल्यात अनेक निरपराधी लोकांना गोवण्यात आलेले पाहुन बारींद्रकुमार घोष, उल्हासकर दत्त, आणि उपेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सर्व दायित्व स्वतःच्या शिरावर घेऊन आपापले वक्तव्य सादर केले होते.ही सारी वक्तव्ये अत्यंत सावधपणे व कमीतकमी माणसे गुंततील अशी काळजी घेऊन तयार करण्यात आली होती. पण नरेंद्र गोस्वामी याच्या माहिती देण्याने जुगांतर व इतर समित्याच्या स्वातंत्र्यसैनिकांची धरपकड सुरू झाली,तसेच वरच्या कोर्टात अरविंद घोष आणि इतरांना फाशीची शिक्षा होण्याची शक्यता वाढली. नरेंद्र गोस्वामी याची साक्ष ग्राह्य न धरण्यासाठी त्याला ठार मारणे क्रांतीकारकांचे प्रथम कर्तव्य ठरले. त्याला त्याच्या विश्वासघातकी कृत्याबद्दल समितीच्या नियमाप्रमाणे ठार मारण्याचा निर्णय घेण्यात आला.हे कठीण आणि अवघड कार्य सत्येन बोस यांच्यावर सोपविण्यात आले.

कारागृहांतील सहकाऱ्यांनी आणि बाहेरील क्रांतीकारकांनी सत्येन बोस यांना सर्व सहाय्य देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे बाहेरून आंत पिस्तुलेही आणण्याचे ठरले. त्यावेळी अठ्ठावीस वर्षाचा, अशक्त आणि किरकोळ अंगकाठीचा, मितभाशी तरूण कन्हयालाल हे सर्व शांतपणे आणि निर्विकारपणे ऐकत होता. सत्येन बोस याने आजाराचे सोंग करून रुग्णालयात आपली रवानगी करून घेतली. त्यांच्या मागून काही दिवसांनी कन्हयालाल जबरदस्त पोटदुखीच्या व्यथेने रुग्णालयात गेले. तेथे ब्रिटिश अंगरक्षकाच्या देखरेखीखाली ठेवण्यात आलेल्या नरेंद्र गोस्वामींशी सत्येन बोस यांनी बोलणे सुरू केले. त्याला विश्वासात घेऊन कटाची माहिती देतो असे सांगून दुसऱ्या दिवशी भेटण्यास सांगितले. मीपण सरकारी साक्षीदार होण्यास तयार असल्याचे विश्वापूर्वक नरेंद्रला सत्येन बोस यांनी स्पष्ट केले.नरेंद्र सत्येनला भेटण्यासाठी आला, तेव्हा त्याच्यासोबत त्याचा अंगरक्षकही होता. सत्येन बोस ने पूर्वीच मिळविलेल्या पिस्तुलातून नरेंद्रवर गोळी झाडली ती नरेंद्रच्या पायात घुसली.नरेंद्र प्राण भयाने पळून जात आहे असे दिसतानाच कन्हयालालने स्वतःच्या पिस्तुलातून त्याच्यावर गोळी झाडली आणि कन्हयालाल व सत्येन यांनी नरेंद्रचा पिच्छा पुरविला. सर्व रुग्णालय दोघांच्या धाडसी कृत्यामुळे हादरले. आणि कन्हयालालच्या पिस्तुलातील गोळ्यांनी नरेंद्र गतप्राण होऊन कोसळला. कन्हयालालच्या आणि सत्येन च्या पिस्तुलातील गोळ्या संपल्यानंतर दोघांनाही अटक करण्यात आली. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे १० नोव्हेंबरला कन्हयाललाला फाशी देण्यात आले. सत्येन बोस याला कोर्टाने जन्मठेप ठोठावली पण वरील कोर्टात ब्रिटिश पोलीसांनी अपील केल्याने त्या कोटीने सत्येन बोस यांना फाशी ठोठावली. २१ नोव्हेंबर १९०८ रोजी सत्येन बोस फाशीच्या फळीवर आरोहण करून पंचतत्वात विलीन झाले.भारतीय स्वातंत्र्य लढ्याला बळकटी देण्यासाठी सत्येन बोस आणि इतरांचे बलिदान प्रेरणादायी ठरले.या घटनेमुळे सरकारी साक्षीदार होण्यासाठी सहसा कोणी पुढे येण्याचे प्रमाण अत्यल्प झाले.

# खडूने रेखाटलेलं आयुष्य

**ज्योतिर्मय साहित्य**




शाळेचे दिवस म्हणजे आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर, निरागस आणि गोड आठवणींनी भरलेला काळ. त्या दिवसांत फक्त अभ्यासाची पाने नव्हती, तर प्रत्येक क्षणात जीवनाची नवी शिकवण दडलेली होती. वार्षिक स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव, शालेय सहली, सांस्कृतिक कार्यक्रम या सगळ्या अनुभवांनी आयुष्याला रंगतदार छटा दिल्या. शाळा म्हणजे केवळ पुस्तकांचं ओझं नव्हतं, तर अनुभवांची खणखणीत शिदोरी होती.

त्या आठवणींमध्ये एक क्षण असा आहे, जो माझ्या मनात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. फळ्यावर सुविचार लिहिण्याची संधी. माझं स्वच्छ, सरळ आणि सुंदर हस्ताक्षर पाहून शिक्षकांनी मला ती जबाबदारी दिली होती. रोज सकाळी शाळा सुरू होण्याआधी मी फळ्यासमोर उभा राहायचो. खडूचा पहिला स्पर्श जसा फळ्यावर उमटायचा, तसं मनात एक वेगळंच विश्व फुलायचं.

विद्या हीच खरी संपत्ती आहे, कष्टाशिवाय फळ नाही, सत्कर्म हेच जीवनाचं सौंदर्य आहे असे सुविचार जेव्हा माझ्या अक्षरांतून फळ्यावर उमटायचे, तेव्हा त्या पांढऱ्या ओळी मला एखाद्या रांगोळीसारख्या भासत. प्रत्येक अक्षराला तोलामोलाची सुंदरता द्यायची इच्छा असायची. फळा सजला की मनही सजून जायचं.


सकाळी मित्रमंडळी वर्गात येताच त्यांच्या नजरा फळ्याकडे वळायच्या. कधी एखादा मित्र किंवा शिक्षक माझ्याकडे बघून म्हणत, ''वा! किती सुंदर लिहिलंयस!'' त्या क्षणी मनात जी गोड भावना निर्माण व्हायची, ती शब्दांत सांगणं कठीण आहे. ही कौतुकाची थाप मला रोज नव्यानं उभारी द्यायची.

कधी शिक्षक एखादा प्रेरणादायी विचार सांगायचे, तर कधी मी पुस्तकात वाचलेलं सुंदर वाक्य निवडून फळ्यावर लिहायचो. माझ्यासाठी ते फक्त अक्षर उमटवणं नव्हतं तर प्रत्येक शब्द मनापासून जगणं होतं. हळूहळू उमगायला लागलं की सुविचार म्हणजे केवळ शब्दांची माळ नाही, तर जीवनाचे खरे धडे आहेत. त्या छोट्याशा जबाबदारीने मला खूप काही दिलं. शिस्त, जबाबदारी, सौंदर्यदृष्टी, विचारांना आकार देण्याची ताकद. खडूचा गंध, फळ्यावर उमटणाऱ्या रेषा आणि त्या अक्षरांचा अभिमान हे सगळं आजही मनात जिवंत आहे. शाळेतील त्या सुविचारांनी मला अक्षरकलेचा आनंद तर दिलाच, पण जीवन जगण्याचा खरा अर्थही शिकवला.



मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354

शाळेच्या निरागस दिवसांतलं ते सुवर्णपर्ण आजही मनात उलगडतं. काळाच्या प्रवाहात ती रम्य सकाळ दूर गेली असली, तरी त्या आठवणींचा सुगंध अजूनही हृदयात दरवळतो. फळ्यावरची अक्षरे जरी पुसली गेली असली, तरी त्यातील मौल्यवान विचारांची बीजे मनाच्या गाभाऱ्यात खोलवर रुजली आहेत. जीवनाच्या प्रत्येक नव्या वाटेवर पाऊल ठेवताना, तीच आठवण मला एखाद्या दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरते. खडूचा ठसा क्षणिक होता, पण त्या विचारांचा ठसा आयुष्यभर टिकून राहिला. एखाद्या गोष्टीला सुंदरतेने, निष्ठेने आणि प्रेमाने केलं, तर ती छोटीशी कृती देखील आयुष्याला अर्थ देऊ शकते, हे मला त्या सुविचारांनी शिकवलं. आज जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा मनापासून जाणवतं - त्या छोट्याशा संधीने फक्त शाळेचा फळा सजवला नाही, तर माझं आयुष्य घडवलं.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559